ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष ११ | पुणें, बुधवार तारीख २ मार्च, १९५५ | अंक ९

## विविध माहिती

**रायपूर येथें नवा विमानतळ**—रायपूर येथें विमानांसाठी एक नवा तळ बांधण्यांत येणार आहे. शहराच्या जवळच असलेल्या कटोरा तलावाच्या जवळची जागा तळासाठी मुक्रर करण्यांत आली आहे. रायपूरचा सध्याचा विमानतळ शहरापासून १० मैलांवर आहे. नव्यानें योजलेल्या जागेवर दुसऱ्या महायुद्धापूर्वी विमानें उतरत असत.

**कच्च्या साखरेची आयात**—चालू सालीं भारतांत जास्तींत जास्त १,५०,००० टन कच्ची साखर आयात करण्याचें सरकारनें ठरविलें आहे. गेल्या वर्षीं १ लाख टनाची मर्यादा ठेवण्यांत आली होती. पण प्रत्यक्ष आयात मात्र ७६,००० टनांचीच करण्यांत आली. ज्या कारखान्यांना कच्ची साखर शुद्ध करण्याचें काम करावयाचें असेल, त्यांनीं ९ मार्च पूर्वी अर्ज करावयाचे आहेत.

**५०० वर्षांपूर्वींचीं देवळें**—पतिआळापासून १२५ मैलांवर असलेल्या खेड्यांत गुप्त धनासाठी शोध चालला असतां सुमारें ५०० वर्षांपूर्वींच्या देवळांचे कांहीं अवशेष सांपडले आहेत. ह्या ठिकाणीं प्राचीन काळीं भरभराटींत असलेलें एखादें शहर असावें असा अंदाज करण्यांत आला आहे. पुराण वस्तु संशोधनाला ह्या देवळांचें साह्य होईल, असें म्हणतात.

**बुद्धानुयायी व माकडें**—सीलोनमधील कांहीं माकडें धरून अमेरिकेंत नेण्यांत येणार असून त्यांच्यावर अणुबाँबविषयक प्रयोग करण्यांत येणार आहेत, असें वृत्त कोलंबोंतील पत्रांत प्रसिद्ध झालें आहे. सीलोनमधील प्रमुख बुद्धानुयायांनीं ह्या प्रयोगांबद्दल निषेध व्यक्त केला असून ही गोष्ट भयंकर स्वरूपाची आहे, असें म्हटलें आहे.

**भारताची जपानला निर्यात**—१९५३–५४ सालीं भारतानें जपानला २३ कोटी रुपये किंमतीचा माल निर्यात केला. उलटपक्षीं, जपानकडून १२ कोटी रुपये किंमतीच्या मालाची आयात करण्यांत आली. भारतानें निर्यात केलेल्या मालांत कापूस ४·६ कोटी रुपये, लोखंडाची माती २·३ कोटी रुपये, मँगेनीजची माती १·४ कोटी रुपये व कोळसा १·२ कोटी रुपये, असा माल आहे.

**जागतिक बँकेनें दिलेलीं कर्जें**—१९५४ च्या दुसऱ्या सहा महिन्यांत जागतिक बँकेनें ८ देशांना मिळून १४,९४,००,००० डॉलर्सचीं कर्जें मंजूर केलीं. कर्ज घेणाऱ्या देशांत ऑस्ट्रिआ, सीलोन, भारत, बेल्जम, कोलंबिआ, मेक्सिको, पेरू व एलसाल्व्हाडोर हे देश आहेत. ह्या काळांत बँकेला निव्वळ उत्पन्न १,२३,००,००० डॉलर्स झालें. १९५३ च्या ह्याच काळांत उत्पन्नाचा आंकडा १,०१,००,००० डॉलर्स होता.

**आग्रा येथील वेड्यांचें इस्पितळ**—आग्रा येथील वेड्यांच्या इस्पितळाची वाढ करण्याचें उत्तर–प्रदेश सरकारनें ठरविलें आहे. ह्या कामासाठी १९५५–५६ सालच्या अंदाजपत्रकांत ३·५५ लाख रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे. वेड्यांच्या इस्पितळांत सध्या ६१७ रहिवासी आहेत. इतक्यांची सोय सध्यां चालू असलेल्या व्यवस्थेंत नीट होऊं शकत नाहीं.

**म्हैसूर सरकारचें यांत्रिक नांगराचें खातें**—१९४७ ते १९५२ ह्या कालांत म्हैसूर सरकारच्या ट्रॅक्टर ऑर्गनायझेशन खात्याला ३२,३२,३१७ रुपये तोटा आला, असें समजतें. एकट्या १९५१–५२ सालींच ८,४७,७८८ रुपये तोटा आला.

**वीज पुरविण्याच्या योजनांसाठी कर्ज**—मुंबई राज्यांतील रोजगारी वाढविण्यासाठी मुंबई सरकारनें कांहीं गांवांना वीज पुरविण्याच्या योजना आंखल्या होत्या. भारत सरकारच्या नियोजन समितीनें अशा प्रकारच्या ७ योजना मंजूर केल्याचें मुंबई सरकारला कळविलें आहे. ह्या योजनांसाठी भारत सरकारकडून २० लाख रुपयांची रक्कम कर्जाऊ देण्यांत येणार आहे.

**मॅनेजिंग एजन्सीची पद्धत**—कंपनी कायद्यामध्यें दुरुस्ती सुचविणारें बिल सिलेक्ट कमिटीकडे विचारार्थ सोंपविण्यांत आलें होतें. कमिटीनें केलेल्या शिफारसींत, सरकारचें अधिक नियंत्रण ठेवून मॅनेजिंग एजन्सीची पद्धत कायम ठेवण्याची एक शिफारस आहे, असें समजतें. कमिटीचा अहवाल मध्यवर्ती विधिमंडळाला अंदाजपत्रकी अधिवेशनांत सादर करण्यांत येणार आहे.

**विजेच्या अधिक उत्पादनाची जरूरी**—स्टेट इलेक्ट्रिसिटी बोर्डस् स्थापन करण्यासंबंधीं विचारविनिमय करण्यासाठी राज्यांच्या संबंधित मंत्र्यांची परिषद दिल्ली येथें भरविण्यांत आली होती. परिषदेंत भाषण करतांना नियोजन–मंत्री श्री. नंदा ह्यांनीं विजेच्या उत्पादनाचीं कामें झपाट्यानें होण्याची आवश्यकता आहे, असें सांगितलें.

**संशोधन–विषयक शिष्यवृत्ति**—कलकत्ता येथें ऑल इंडिआ डेंटल कॉन्फरन्सचें १० वें अधिवेशन भरलें होतें. ह्या प्रसंगीं युनायटेड ट्रेडर्स लि. ह्या कंपनीतर्फे दंतविषयक संशोधनासाठी देण्यांत येणारी गिब्ज शिष्यवृत्ति यंदांहि चालू ठेवण्यांत येणार असल्याचें जाहीर करण्यांत आलें. शिष्यवृत्ति ७,५०० रुपयांची असून ती १९५२ पासून दरवर्षीं देण्यांत येत आहे.

**वल्लभभाई पटेल स्टॅडिअम**—अहमदाबाद कॉर्पोरेशननें १२ लाख रुपये खर्चून वल्लभभाई पटेल स्टॅडिअम बांधण्याचें ठरविलें आहे. क्रीडांगणासाठी लागणारी जमीन क्रिकेट क्लब ऑफ अहमदाबाद ह्या संस्थेकडून ९०,००० रुपये देऊन विकत घेण्यांत आली आहे. जागेचें क्षेत्रफळ ८०,००० चौरस फूट आहे.

## भारतामधील गुन्हेगारी सर्वांत कमी, पण खून जास्त

इंटरनॅशनल क्रिमिनल पोलिस कमिशनच्या कचेरीनें जगांतील देशांच्या गुन्हेगारीविषयीं कांहीं माहिती प्रसिद्ध केली आहे. त्यावरून असें दिसून येतें कीं, भारतामधील गुन्हेगारीचें प्रमाण इतर कोणत्याहि देशाच्या मानानें कमी आहे. वरील संस्थेच्या २३ व्या अधिवेशनांत ३४ देशांतील ह्यासंबंधींचे आंकडे मांडण्यांत आले आणि त्यांचें पृथक्करणहि करण्यांत आलें. ज्या गुन्ह्याबाबत पोलिसांनीं आपण होऊन कायदेशीर कारवाई केली पाहिजे अशा प्रकारचे गुन्हे भारतांत १,००,००० लोकसंख्येमागें फक्त १६५ होतात. इतर कांहीं देशांतील अशा प्रकारच्या गुन्ह्यांचे आंकडे पुढीलप्रमाणें आहेत. तुर्कस्थान २४६, इटली ४०८, अमेरिका १,३२२, ब्रिटन १,३४२, फ्रान्स १,४८४, जपान १,६०५ आणि प. जर्मनी २,९९२. गंभीर स्वरूपाच्या चोऱ्यांच्या संख्येंतहि भारताचा अनुक्रम सर्वांत शेवटचा लागतो. अशा प्रकारच्या चोऱ्या भारतांत दर १,००,००० लोकसंख्येमागें अवघ्या ४६ होतात. इतर कांहीं देशांचे आंकडे असे : फ्रान्स ६५, इटली १६७, ब्रिटन २५७, प. जर्मनी २६८ आणि अमेरिका ३२५. साध्या चोरीच्या बाबतींतहि भारताचा अनुक्रम शेवटचा लागतो. अशा चोऱ्या भारतांत एक लाख लोकसंख्येमागें ६९ होतात, इटलींत १२६ होतात, फ्रान्समध्यें ३६६ होतात, ब्रिटनमध्यें ९११ होतात, प. जर्मनींत ९३५ होतात व अमेरिकेंत ९८६ होतात. जाणून बुजून केलेल्या खुनांचें प्रमाण मात्र भारतांत दर लाख लोकसंख्येमागें ब्रिटन व प. जर्मनीच्या मानानें अधिक आहे. भारतांत असे खून २·९ होतात, ब्रिटनमध्यें ०·८ होतात व प. जर्मनींत २·० होतात.

## ओढ्या नाल्यांना बांध घालण्याची योजना

भारतांतील मोठमोठ्या नद्यांना महापूर येऊन वर्षानुवर्षे फार नुकसान होतें हें विश्रुतच आहे. अशा नद्यांच्या महापुरांवर नियंत्रण ठेवण्यासाठीं बांधकामाच्या मोठमोठ्या योजना हातीं घेण्यांत आल्या आहेतच. परंतु पावसाळ्यांत लहान नाल्यांना अगर ओहोळांनाहि वेगानें वाहणाऱ्या पाण्याचे पूर येतात व त्यामुळें आसपासच्या शेतीचें खुप नुकसान होतें. पंजाब सरकारनें अशा प्रकारच्या १०५ लहान-मोठ्या ओढ्यांना काबूंत ठेवण्यासाठीं बांधबंदिस्तीची योजना आंखली आहे. हे बहुतेक ओढे डोंगराळ भागांतून जोरानें वहाणारे आहेत. त्यांच्या प्रवाहामुळें होशिआरपूर जिल्ह्यांतील १४. लाख एकर पिकाऊ जमिनीपैकीं ३ लाख एकर जमिनीचें नुकसान झालेलें आहे. जमिनीची अधिक नुकसानी टाळण्यासाठी १ कोटा रुपये खर्चून बांधांचीं कामें करण्यांत येणार आहेत. ओढ्यांना ठिकठिकाणीं बांध घालून त्यांचें रूपांतर ८ किंवा ९ मुख्य प्रवाहांत करण्यांत येणार आहे. नंतर हे कृत्रिम प्रवाह मुख्य नद्यांना मिळतील. राज्याच्या पूर-नियंत्रक मंडळाची बैठक नुकतीच भरली असतांना एका प्रमुख ओढ्याच्या नियंत्रणाचें काम प्रथम प्रयोगादाखल करण्यांत यावें असा निर्णय घेण्यांत आला. ह्या प्रायोगिक कामालाच सुमारें ५ लाख रुपये खर्च येईल. पावसाळा सुरू होण्यापूर्वी कामाला प्रारंभ करण्यांत येणार आहे. रावी नदीला पावसाळ्यांत येणाऱ्या पुरामुळें भारताच्या बाजूकडील किनाऱ्याजवळील शेतकऱ्यांच्या शेतांत पाणी पसरतें. ह्या पाण्याला थोपवून धरण्यासाठीं ह्या बाजूला रावी नदीला समांतर अशी एक भिंत बांधण्याचेंहि सरकारनें ठरविलें आहे. ह्या कामासाठीं ६ लाख रुपयांची रक्कम मंजूर करण्यांत आली आहे.

## ब्रिटनकडे अणु-शास्त्रज्ञांची मागणी

भारताचे पंतप्रधान श्री. जवाहरलाल नेहरू नुकतेच ब्रिटनला जाऊन आले. ब्रिटनमधील आपल्या मुक्कामांत त्यांनीं अणुविषयक पदार्थविज्ञानाचा अभ्यास केलेल्या ३०० तज्ज्ञांनीं भारताला मदत करावी, अशी विनंति ब्रिटिश सरकारला केल्याचें समजतें. भारतांतील अणुशक्तीच्या उत्पादनाच्या योजनांत त्यांचें सहकार्य मिळालें तर तें हवें आहे. ब्रिटिश सरकारचीं एतद्विषयक खातीं ह्या प्रश्नाचा विचार करीत आहेत. तथापि, भारताला ह्या बाबतींत मदत करण्यांत ब्रिटनचा अगदींच स्वार्थ नाहीं असें मात्र नाहीं. अणुशक्तीच्या उत्पादनांत ब्रिटननें भारताला प्रथमपासूनच मदत केली, तर ह्या नव्या एंजिनिअरिंगच्या क्षेत्रासाठी लागणाऱ्या यंत्रसामुग्रीची व इतर साधनांची मागणीहि भारत ब्रिटनकडेच करील हें उघड आहे. त्यामुळें भारताची विनंति मान्य होणें अशक्य आहे, असें नाहीं. अणुशक्तीविषयक संशोधनांत व तद्विषयक यंत्रसाहित्यांत सध्यां तरी अमेरिकाच अग्रेसर आहे. ब्रिटननें भारताला मदत केली नाहीं तर भारताला इतर देशांकडून ती घ्यावी लागेल. असें असलें तरी खुद्द ब्रिटनमध्येंच अणुशक्ती-विषयक एंजिनिअर्सचा व तंत्रज्ञांचा तुटवडा आहे व त्याबद्दल बरीच चिंताहि व्यक्त करण्यांत येत आहे. निरनिराळ्या ब्रिटिश कारखान्यांकडून अशा प्रकारच्या तंत्रज्ञांच्या जागांबद्दल वृत्तपत्रांतुन जाहिराती देण्यांत येत आहेत. त्यामुळें भारताची विनंति ब्रिटनला पूर्णतया मान्य करतां येईल किंवा नाहीं, ह्याविषयीं शंका व्यक्त करण्यांत येत आहे. भारताखेरीज इतर कांहीं देशांकडूनहि ब्रिटनकडे वरील प्रकारच्या मागण्या आल्या आहेत. त्यामुळें मागणी व पुरवठा ह्यांचा मेळ बसणें कठीण दिसतें.

## राजस्थानची आर्थिक तपासणी

राजस्थान सरकारचे मुख्य मंत्री श्री. मोहनलाल सुखाडिआ ह्यांनीं असें जाहीर केलें आहे, कीं राज्याची आर्थिक दृष्टीनें संपूर्णपणें तपासणी करण्याचें ठरलें आहे. ह्या कामांत प्रमुख अर्थशास्त्रज्ञांचें साह्य घेण्यांत येणार आहे. राज्याच्या आर्थिक विकाससंबंधीं बोलतांना ते म्हणाले कीं, औद्योगिक भरभराट होण्यासाठीं कांहीं मोठाले उद्योगधंदे निघाले पाहिजेत. अशा उद्योगधंद्यांना लागणारा कच्चा माल आणि इतर साधनें राजस्थानांत आहेत. राजस्थानांत 'जिप्सम' ह्या धातूचा देशांतील सर्वांत मोठा साठा आहे. त्याचा उपयोग करून अमोनिअम सल्फेट तयार करण्याचा कारखाना काढण्याची एक तपशीलवार योजना भारतीय सरकारला सादर करण्यांत आली आहे. त्याचप्रकारें बिकानेर भागांत 'सिमेंट सल्फर' तयार करण्याचा कारखाना काढण्याचाहि सरकार विचार करीत आहे. चितोडगड येथें एक सिमेंटचा कारखाना आणि उदयपूर येथें कापडाची गिरणी काढण्यासंबंधीं वाटाघाटी चालू आहेत. सांबर येथें रासायनिक कारखाना काढण्याचा सरकारचा उद्देश आहे. राजस्थानमध्यें कातडी माल तयार करण्याच्या कारखान्याला आणि लोकरीचें सूत करणाऱ्या गिरणीला चांगला वाव आहे. हे दोनहि कारखाने काढणें कितपत शक्य आहे तें अजमावून पहाण्याचें काम सध्यां चालू आहे. ह्या सर्व औद्योगिक योजनांना भांडवल पुरविण्याचा प्रश्न अर्थातच महत्त्वाचा आहे. परंतु राजस्थान इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशनच्या स्थापनेनें औद्योगीकरणाच्या मार्गांतील आर्थिक अडचणी दूर होतील अशी अपेक्षा आहे. राजस्थान हें औद्योगिक दृष्ट्या सर्वांत मागासलेलें राज्य आहे. त्याचा विकास घडवून आणण्यासाठी प्रयत्न करण्यासाठीं श्री. सुखाडिआ कांहीं दिवसांपूर्वी मुंबईला आले होते.

# अर्थ

बुधवार, ता. २ मार्च, १९५५





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## भारत–अमेरिका तांत्रिक सहकार्याचा व्याप

### संयुक्त योजनांची आंखणी व पैशाची तरतूद

कृत्रिम खत, शेतीचीं अवजारें आणि साधनें करण्यासाठीं लोखंड व पोलाद, टोळधाडीला प्रतिबंध आणि वनस्पति संरक्षण, जमिनीची सुपीकता आणि खतांचा उपयोग, मच्छिमारी, नलिका विहिरी, ग्रामसेवकांचें शिक्षण, ग्रामविकास योजना, हिंवताप नियंत्रण, जंगलसंशोधन, नदीखोरे विकास, भूपृष्ठाखालील योजना, इमारती सामानाची योजना, कमी खर्चाच्या घरबांधणीच्या सुधारलेल्या पद्धती, सेंट्रल लेबर इन्स्टिटयूट, कोळशाचा तलास, रेल्वेजचा विकास, पोलाद पुरवठा, मोठमोठीं यंत्रें चालविण्याचें शिक्षण, रिहंद खोरें विकास, मद्रास शहर विद्युत्केंद्राची वाढ, शेतकी यंत्रांचें शिक्षण, राजस्थान विद्युत्-पुरवठ्यांत सुधारणा, हवाई दळणवळणांच्या सोईत वाढ, राष्ट्रीय पाणीपुरवठा आणि स्वच्छता, औद्योगिक संशोधन आणि तंत्रविषयक कामें करणाऱ्या संस्था, तांत्रिक शिक्षणाच्या संस्था, शेतकी संशोधन, शिक्षण व विकास संस्था, वैद्यक विद्यालयें आणि संबंधित संस्था, आरोग्याचें शिक्षण देणारीं शिक्षण केंद्रें, अन्नधान्यासाठीं आधुनिक कोठार, तांत्रिक क्षेत्रांतील तज्ज्ञ, इत्यादि विषयांचे बाबतींत भारत–अमेरिका सहकार्याचे अनेक करार झालेले आहेत, त्यावरून ह्या सहकार्याच्या व्यापाची कल्पना येईल.

५ जानेवारी, १९५२ रोजीं भारतीय सरकार आणि अमेरिकन सरकार यांच्यांत जो सामान्य करार झाला त्या कराराच्या वेळेपासून भारत–अमेरिकन तांत्रिक सहकार्याचा कार्यक्रम हल्लींच्या स्वरूपांत अस्तित्वांत आहे. मध्य व दक्षिण अमेरिका, मध्य पूर्व, आग्नेय आशिया आणि आफ्रिका या भागांत जे अनेक इतर कार्यक्रम चालू आहेत त्यांच्यासारखाच हा कार्यक्रम आहे. कोलंबो योजनेचा आणि यूनोच्या तांत्रिक साहाय्याचा जो मूलभूत उद्देश आहे, तोच या कार्यक्रमाचाहि आहे. तो मूलभूत उद्देश म्हणजे आर्थिक व सामाजिक विकासाला मदत करणें.

### अंमलबजावणीची व्यवस्था

भारताच्या हल्लींच्या पंचवार्षिक योजनेला चालना देण्यासाठीं भारत व अमेरिका यांच्या सहकार्यानें या कार्यक्रमानुसार संयुक्त योजना आंखल्या जातात. अशा संयुक्त योजना आंखण्यासाठीं भारत सरकारच्या नियोजन मंडळाला ( प्लॅनिंग कमिशन ) एका खास समितीचें स्वरूप दिलें जातें आणि अमेरिकन सरकारच्या "फॉरेन ऑपरेशन्स अॅडमिनिस्ट्रेशन" च्या ("परराष्ट्रीय कार्ययंत्रणे"च्या) वतीनें नवी दिल्ली येथील अमेरिकेचें तांत्रिक सहकार्य मंडळ ( मिशन ) भारत सरकारच्या नियोजन मंडळाशीं सहकार्य करतें. अशा रीतीनें भारतांत जे संयुक्त कार्यक्रम आंखले जातात त्यांची अंमलबजावणी भारत सरकारच्या योग्य त्या मंत्रीविभागांकडून केली जाते. अमेरिकेच्या तांत्रिक सहकार्य मंडळाची ( मिशन ) कचेरी फरीदकोट हाऊस, लिटन रोड, नवी दिल्ली येथें आहे. "फॉरेन ऑपरेशन अॅडमिनिस्ट्रेशन"ची कचेरी वॉशिंग्टन, डी. सी. येथें आहे.

भारत–अमेरिकन कार्यक्रमाची आंखणी अमेरिकेच्या जमाखर्चाच्या सालाला धरून केलेली आहे. तें साल १ जुलैला सुरू होतें आणि पुढील वर्षाच्या ३० जूनला संपतें. ता. ३० जून १९५२ रोजीं पूर्ण झालेल्या आर्थिक सालीं अमेरिकन कॉंग्रेसनें भारत–अमेरिकन कार्यक्रमासाठीं ५ कोटी, ४५ लक्ष डॉलर ( एक डॉलर म्हणजे सुमारें ४ रुपये १२ आणे ) मंजूर केले होते. त्यानंतर १९५३ च्या आर्थिक सालीं ४ कोटी, ५४ लक्ष डॉलर आणि १९५४ च्या आर्थिक सालीं ८ कोटी, ९१ लक्ष डॉलर अशा रकमा कॉंग्रेसनें मंजूर केल्या. १९५४ च्या आर्थिक सालीं कॉंग्रेसनें आर्थिक मदतीच्या खास निधींसाठीं ६ कोटी, ५ लक्ष डॉलर बाजूला काढले.

त्या तीन सालांत जे एकंदर १८ कोटी, ९० लक्ष डॉलर मंजूर झाले त्यांपैकीं १७ कोटी, ८ लक्ष, १८ हजार डॉलरची रक्कम ३१ संयुक्त योजनांसाठीं राखून ठेवली आहे. त्या संयुक्त योजनांच्या अंमलबजावणीच्या करारांत डॉलरच्या व रुपयांच्या अशा दोन्ही प्रकारच्या देणग्यांचा अंतर्भाव आहे. त्याच संयुक्त योजनांसाठीं त्या तीन सालांच्या मुदतींत भारतानें १,३४,१९,७०,३६० रुपये ( म्हणजे ४·७६ रुपयांचा एक डॉलर या दरानें सुमारें २८ कोटी, १९ लक्ष, ३० हजार डॉलर ) दिले आहेत. त्याशिवाय, "निधी–अ" (फंड–ए) या नांवानें ओळखल्या जाणाऱ्या निधींपैकीं ६ लक्ष, ३२ हजार डॉलरची रक्कम "दामोदर व्हॅली कॉर्पोरेशन" ला हर्झा इंजिनियरिंग करार लागूं करण्यासाठीं १९५४ सालीं मुक्रर केली गेली, आणि त्यामुळें "निधि–अ" ची संपूर्ण रक्कम १७ कोटी, १४ लक्ष, ५० हजार डॉलर झाली. एकेका वर्षाच्या रकमा पुढीलप्रमाणें होत्या. १९५२ : ५ कोटी डॉलर, १९५३ : ३ कोटी, ८३ लक्ष, ५० हजार डॉलर, १९५४ : ८ कोटी, ३१ लक्ष डॉलर.

संपूर्ण पंचवार्षिक योजनेसाठीं भारतानें २२ अब्ज, ४४ कोटी रुपये किंवा सुमारें ४ अब्ज, ७१ कोटी, ४० लक्ष डॉलर खर्च करण्याचें ठरविलें आहे.

### तांत्रिक तज्ज्ञ व भारतीय तंत्रज्ञांचें शिक्षण

भारत–अमेरिकन कार्यक्रमांत संयुक्त योजनांशिवाय आणखी दोन महत्त्वाचीं अंगें आहेत. भारताला अमेरिकन तांत्रिक तज्ज्ञ मिळवून देणें हें एक, आणि भारतीय तंत्रज्ञांना अमेरिकेंत शिक्षणासाठीं पाठविणें, हें दुसरें. त्या दोन्हीं बाबतींत प्रवासखर्चाचा मोठा भाग अमेरिकन द्रव्यनिधींतूनच दिला जातो. अमेरिकन तांत्रिक तज्ज्ञांचे पगार देखील अमेरिकन द्रव्यनिधींतूनच दिले जातात.

स्थूलमानानें पाहतां, ज्या आवश्यक वस्तू व साधनें भारतांत सहजासहजीं मिळत नाहींत त्या वस्तू व तीं साधनें परदेशांत विकत घेऊन भारताकडे पाठविणें, आणि नलिका विहिरींच्या खोदकामासारखीं कामें करण्यासाठीं केलेल्या करारांचा खर्च देणें, या बाबतींत अमेरिकेनें संयुक्त योजनांसाठीं दिलेला पैसा वापरला

जातो. भारताच्या भूमीवरील वाहतुकीचा व व्यवस्थेचा खर्च, भारतीय नोकरवर्गाचा पगार आणि बांधणीच्या कामांचा खर्च यासाठीं साधारणपणें भारतीय पैशाचा उपयोग केला जातो.

कृत्रिम खतें आणि लोखंड व पोलाद यांसारखा आयात माल जेव्हां भारतांत विकला जातो, तेव्हां त्या विक्रींतून मिळालेले रुपये "निधी-ब" (फंड बी) या नांवानें ओळखल्या जाणाऱ्या निधींत जमा होतात, आणि त्यांतून संयुक्त योजनांसाठी भारताला रुपये काढतां येतात. आतांपर्यंत अशा रीतीनें विक्री करून जमविलेल्या पैशाचा बराच मोठा भाग (१,९४,७५,००० डॉलरांच्या बरोबरीचा) ग्रामीण प्रगतीसाठी आंखलेल्या ग्रामविकास योजनांना (कम्युनिटी प्रॉजेक्ट) भारताकडून मिळालेल्या मोठमोठ्या देणग्यांत वापरला गेला आहे. १९५४ चा पोलादाचा करार पाहतां असें दिसून येतें कीं, खाजगी औद्योगिक प्रगतीला हातभार लागणाऱ्या औद्योगिक विकास संस्थेच्या फिरत्या भांडवलाचा एक भाग म्हणून १ कोटी, ५० लक्ष डॉलरच्या किंमतीची रुपयांची रक्कम बाजूला काढून ठेवली गेली आहे.

कांहीं योजनांमध्यें पैशाची बचत झाली आहे आणि इतर कांहीं योजनांत जादा पैसे घालण्याची जरूरी भासली आहे, म्हणून डॉलरच्या व रुपयांच्या रकमांत वारंवार फेरबदल करावे लागले आहेत.

### प्रारंभीं शेती-विकासावर भर

आरंभींच्या दोन वर्षांत, भारत–अमेरिकन कार्यक्रमाचा भर मुख्यतः शेतीच्या विकासावर होता; कारण पंचवार्षिक योजनेंत शेतीच्या विकासाला अग्रस्थान आहे. ग्रामविकास, नलिका विहिरी, नदीच्या स्रोत्यांचा विकास, कृत्रिम खतें आणि पोलाद, या विषयांना शेतीच्या विकासाच्या कार्यक्रमांत प्रामुख्य होतें. त्याबरोबरच, आरोग्य क्षेत्रांतील एक मुख्य उपक्रम म्हणून मलेरिया-प्रतिबंधाचा एक राष्ट्रव्यापी कार्यक्रम हातीं घेण्यांत आला होता.

१९५४ सालीं आर्थिक साहाय्याचे खास निधी हातीं असल्यामुळें वाहतूक व उद्योगधंदे यांच्याकडे प्रामुख्यानें लक्ष दिलें गेलें. रेल्वेची साधनसामुग्री, रेल्वे-उद्योगधंदे यांना लागणारें पोलाद, रिहंदची जलविद्युत-विकासाची योजना आणि मद्रास शहर व राजस्थान येथील विद्युत्‌शक्तीच्या सोयींची वाढ, या बाबतींतील कार्यक्रमांना चालना मिळाली. १९५४ चा कार्यक्रम पूर्ण करण्यासाठी अजून कित्येक करार करावयाचे आहेत.

### बँक चेअरमन, श्री. करंदीकर, ह्यांचा सत्कार

रविवार दि. २७–२–१९५५ रोजीं श्री. वि. ज. उपाख्य दादासाहेब करंदीकर, चेअरमन, पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि. यांचा षष्ठ्यब्दि समारंभ श्री. के. पी. जोशी, चेअरमन, भारत इंडस्ट्रियल बँक लि., पुणें यांचे अध्यक्षतेखालीं बँकेच्या दिवाणखान्यांत थाटानें साजरा करण्यांत आला. या शुभप्रसंगीं श्री. चिं. वि. जोशी, श्री. ग. न. श्रीगोंदेकर, श्री. ग. र. तुळशीबागवाले, श्री. य. घों. ओगले, श्री. ना. वि. भोंडे, श्री. रा. वा. पवार, श्री. शंकरराव इनामके, श्री. शिवाजीराव काळे, डॉ. जालनापूरकर, श्री. मायदेव, वगैरे मंडळींचीं समयोचित गुणवर्णनपर भाषणें झालीं व त्यांना दीर्घ आयुरारोग्य चिंतिलें. त्यावेळीं सुमारें २५ सहकारी तसेंच इतर संस्थांतर्फे श्री. दादासाहेबांना पुष्पहार घालण्यांत आले.

**पूर्व–प्राथमिक शिक्षणाची व्यवस्था**—मध्य प्रदेशांतील मुलांना पूर्व–प्राथमिक शिक्षण देण्याची योजना राज्य सरकारनें तयार केली आहे. योजनेप्रमाणें सर्व राज्यांत मिळून असें शिक्षण देणारीं ५०० मंदिरें उघडण्यांत येतील. ही व्यवस्था फक्त शहरांतील मुलांपुरतीच मर्यादित राहील.

## बँकांच्या चालकवर्गाचें इकडे लक्ष जाईल काय?

हल्लीं सरकारी धोरणानुसार सहकारी तत्त्व थेट खेड्यापर्यंत पोहोंचविण्याकरितां विविध प्रकारच्या सोसायट्या व जिल्हा-बँका निघत आहेत, ही समाधानाची गोष्ट आहे. परंतु कार्यक्षम नोकरवर्गहि पाहिजे. धान्यावर नियंत्रण असतांना सहकारी सोसायट्या फार प्रमाणावर निघाल्या व निर्नियंत्रण झाल्याबरोबर पुष्कळच लोप पावल्या. ह्याला कारण सोसायटीचे स्वार्थी सभासद व अशिक्षित नोकरवर्ग होय, हें आपणां सर्वांना माहीत आहेच. त्याबाबत हल्लीं शक्य तों काळजी घेतली जात आहे. सोसायटी अगर सहकारी बँक आपला नोकरवर्ग सुशिक्षित असावा ह्याकडे लक्ष देत आहेच, परंतु मला एक शंका येते कीं, पैशाची जी देवघेव होते त्याकरितां अशा प्रकारचा शिक्षित नोकरवर्ग असतो काय? मला नाहीं वाटत असावा; कारण खोटीं नाणीं, खोट्या नोटा ओळखणें अगर पारखणें वगैरेचें शिक्षण सराफास बिलकुल नसतें व त्यामुळें त्याला खोट्या नाण्याबद्दल अगर नोटाबद्दल खिशांतून भरावें लागतें. अगोदरच त्याचें वेतन कमी असतें आणि त्यांत हा सोसावा लागणारा भुर्दंड. त्यामुळें त्याची परिस्थिति शोचनीय होते. तेव्हां माझी अशी चालक मंडळास विनंती आहे कीं, रिफ्रेशर्स कोर्स घ्यावे व अशा नोकरवर्गाला मुंबईतील टांकसाळ व नाशिकचा नोटांचा कारखाना प्रात्यक्षिक म्हणून दाखवावा. म्हणजे हल्लीं जी त्यांची परिस्थिति होते, ती टळेल.

बँकेचा अगर सोसायटीचा भरणा ह्या बँकेंतून त्या बँकेंत अगर शाखेंत नेला जातो. हल्लींची बिकट परिस्थिति लक्षांत घेतां ही जोखीम नेणें म्हणजे सुळावरची पोळीच. प्रसंगीं प्राण जातो अशीं उदाहरणें घडलीं आहेत. कारण, पुरेसा बंदोबस्त नाहीं. पैशाचा विमा बँका उतरतात परंतु तो पैसा वाहून नेणाऱ्या इसमांची काय वाट? ह्याचा चालकवर्ग बिलकुल विचार करीत नाहीं. त्यांना जरूर तेवढें संरक्षण देणें, हें चालकवर्गाचें आद्य कर्तव्य आहे. तरी ह्याहि बाबतींत जरूर ती उपाययोजना होईल, असा मला विश्वास वाटतो.

सौ. कमलिनी प्रभाकर टोणगांवकर,
डायरेक्टर, नाशिक पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँक लि.

### जसा खेळ, तसें परराष्ट्रीय धोरण

"दि न्यू स्टेट्समन अँड नेशन" चे संपादक, मि. किंग्जले मार्टिन, ह्यांनीं दिल्ली येथील आपल्या भाषणांत सांगितलें, कीं कोणत्याहि देशाच्या परराष्ट्रीय धोरणाचें रहस्य त्या देशांतील लोक कोणता खेळ खेळतात, ह्यावरून ओळखतां येतात. "ब्रिटिश लोक क्रिकेट खेळतात व त्यामुळें क्रिकेटच्या सामन्याप्रमाणें त्यांच्या परराष्ट्रीय धोरणाचा शेवट 'अनिर्णित' होतो. बुद्धिबळें खेळणारे रशियन लोक राजाला शह देण्याचा प्रयत्न करतात, तर पत्ते खेळणारे अमेरिकन लोक त्यांच्या परराष्ट्रीय धोरणांतहि जुगारी ठरतात," असें ते म्हणाले.

### नाशिक डि. सें. को. बँकेचें उद्‌घाटन

नाशिक डि. सें. को. बँकेचें उद्‌घाटन दि. २० रोजीं प्रा. ध. रा. गाडगीळ ह्यांनीं श्री. हिरे ह्यांच्या अध्यक्षतेखालीं केलें. "सहकारी सोसायटी व तिचे सभासद ह्यांचें नातें केवळ धनको व ऋणको ह्या स्वरूपाचें असतां कामा नये; सभासद हा सहकारी संघटनेचा घटक आहे हें त्यानें लक्षांत बाळगलें पाहिजे," असें त्यांनीं आपल्या भाषणांत सांगितलें.

### किर्लोस्कर इंजनांना जर्मनींत मागणी : निर्यात समारंभ

खडकी येथील किर्लोस्कर ऑइल इंजिन्सच्या कारखान्यांत तयार झालेलीं इंजनें परदेशांत खपूं लागलीं आहेत. जर्मनींत पाठविण्याचीं पहिलीं २० इंजनें निर्यात करण्याचा उपक्रम श्री. मुरारजी देसाई ह्यांच्या हस्तें मोठ्या समारंभानें दि. २७ रोजीं कंपनीच्या कारखान्यांत झाला. त्यांच्या हस्तें एक इंजन यारीच्या साहाय्यानें ट्रकमध्यें चढविण्यांत आलें. त्यावेळीं श्री. शंतनुराव किर्लोस्कर ह्यांनीं आपल्या भाषणांत सांगितलें, कीं कंपनीनें सायप्रस व मध्यपूर्व देशांत इंजनें विकलीं आहेत. आंतरराष्ट्रीय स्पर्धेस तोंड देतां यावें, ह्यासाठीं सहकारी साह्य व प्रोत्साहन ह्यांची आवश्यकता आहे.

---

### ग्रेट ब्रिटननें बँक रेट कां वाढवला ?

ब्रिटिश अर्थमंत्र्यांनीं गेल्या आठवड्यांत बँक रेट १% नें वाढवून तो ४½% केला व लोकांच्या खर्चास आवळून ब्रेक लावला. बँक ऑफ इंग्लंड ज्या दरानें कर्ज देते, तो दर म्हणजे बँक रेट होय. १० मार्च, १९३२ नंतर इतका भारी दर कधींच करण्यांत आलेला नव्हता. युद्धजन्य सक्तीच्या काटकसरींतून मुक्तता व मजुरींचे वाढलेले दर, ह्यामुळें लोकांचा खर्चिकपणा वाढला असून लोक चैनीच्या जिनसांवर खर्च करूं लागले. १९५४ च्या शेवटच्या तिमाहींत आयात ४,७२,००,००० पौंडांनीं वाढली. जानेवारींत निर्गतीपेक्षा आयात ७,३४,००,००० पौंड अधिक भरली. त्यामुळें परराष्ट्रीय येण्यापेक्षा देणें अधिक होऊं लागलें. हप्तेबंदीनें मालाची खरेदी करण्याची लोकांची प्रवृत्ति वाढत आहे. ह्या खरेदीस बँका कर्जाऊ रकमा देतात व स्वतः बँक ऑफ इंग्लंडकडून कर्जे काढतात. हीं कर्जे महाग करण्याचा म्हणजे त्यावरील व्याजाचा बोजा वाढविण्याचा अर्थमंत्र्यांचा उद्देश आहे व त्यासाठीं बँकरेट ४½% पर्यंत नेण्यांत आला आहे. मोटारी, टेलिव्हिजन सेट्स, रेडिओ, फर्निचर, इत्यादि माल लोकांनीं कमी विकत घ्यावा व ग्रेट ब्रिटनच्या परराष्ट्रीय येण्या-देण्यांतील प्रतिकूल तफावत कमी व्हावी, अशी बँक रेट वाढीमागील अपेक्षा आहे. हुजूरपक्षानें लोकप्रियता वाढविण्यासाठीं केलेल्या खुल्या व्यापाराचा हा दुष्परिणाम आहे, अशी टीका मजूर पुढाऱ्यांनीं केली आहे.

---

### भारत सरकारचें अंदाजपत्रक

( आंकडे कोटी रुपयांचे )

| | १९५४–५५ अंदाज | १९५४–५५ दुरुस्त अंदाज | १९५५–५६ अंदाज |
|---|---|---|---|
| उत्पन्न | ४५१·७३ | ४५१·०८ | ४६८·७६ |
| खर्च | ४६७·०९ | ४५६·०८ | ४९८·९३ |
| नवी करवाढ | | | २१·७० |
| तूट | १५·३६ | ५·०० | ८·४७ |

### मुंबई सरकारचें अंदाजपत्रक

| | उत्पन्न | खर्च | वाढावा |
|---|---|---|---|
| १९५५–५६ (अंदाज) | रु. ८०,१०,७२,००० | रु. ७९,८८,३५,००० | रु. +२२,३७,००० |
| १९५४–५५ ( दुरुस्त अंदाज ) | ७१,८०,३३,००० | ७१,२२,१६,००० | +५८,१७,००० |
| १९५३–५४ ( पक्का हिशेब ) | ७२,२७,२७,००० | ७१,११,८४,००० | +१,१५,४३,००० |


## “कण आणि क्षण”चें गुजराती भाषांतर

## સુખી જીવનની પગદંડી

અથવા

## ગૃહજીવનનું માંગલ્ય

लेखक : श्री. वा. काळे, संपादक, “ अर्थ ”

[ अनुवादक : प्रा. शशिन् ओझा, एम्. ए. पुणें येथील फर्ग्युसन व बृहन्महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्समधील गुजरातीचे आठ वर्षे प्राध्यापक.]

प्रकाशक : सस्तुं साहित्य वर्धक कार्यालय. भद्र जवळ, अहमदाबाद.

प्रस्तावना लेखक : मा. दादासाहेब मावळंकर, अध्यक्ष, लोकसभा, नवी दिल्ली.

“ महाराष्ट्राचे एक प्रसिद्ध विचारवंत लेखक, श्री. श्रीपाद वामन काळे, ह्यांच्या “ कण आणि क्षण ” ह्या पुस्तकाचें गुजरातींत रूपांतर करून प्रा. शशीन ओझा ह्यांनीं गुर्जर जनतेची फार मोठी सेवा केली आहे, असें मी म्हटलें तर त्यांत जरासुद्धां अतिशयोक्ति नाहीं. श्री. काळे ह्यांनीं सुखी जीवनाची किल्लीच जणूं काय प्रत्येकाच्या हातांत दिली आहे. विषयाचें प्रतिपादन कलात्मक आणि सहज पटेल, असें आहे. प्रा. ओझा ह्यांनीं साध्या, सरळ भाषेंत ह्या पुस्तकाचें रूपांतर करून व्यक्ति, कुटुंब, समाज आणि देश यांची जी सेवा केली आहे त्याबद्दल मी त्यांचें हार्दिक अभिनंदन करतों. ”

—ग. वि. मावळंकर
( प्रस्तावना लेखक )

“ महाराष्ट्राचे एक ख्यातनाम लेखक व सुविचारक श्रीयुत श्रीपाद वामन काळे ह्यांनीं हृदयंगम शैलीनें लिहिलेलें हें प्रेरक व मार्गदर्शक पुस्तक गुजराती जनतेला रुजू करतांना मला सहाजिकच आनंद वाटतो. प्रस्तुत पुस्तकावर महाराष्ट्रांतील समर्थ, विद्वान्, विचारक आणि साहित्यकार ह्यांनीं मुक्तहस्तानें व मुक्तकंठानें स्तुतिसुमनांचा वर्षाव केला आहे. पुस्तकाची दुसरी आवृत्ति तात्काळ प्रसिद्ध करावी लागली, हें त्याचें निदर्शक आहे. गुजरातसुद्धां पुस्तकाचें असेंच स्वागत करील, असा विश्वास वाटतो. ”

—शशिन् ओझा
( अनुवादक )

## कण आणि क्षण

### ( सुखी जीवनाच्या पाऊलवाटा )

*पृ. सं. १६०. दुसरी आवृत्ति. किं. २॥ रु.*

*र. पु. परांजपे, ना. सी. फडके, शं. वा. किर्लोस्कर, वि. वि. जोशी, वि. द. घाटे, इरावती कर्वे, इंदिराबाई देवधर, केसरी, सकाळ, लोकसत्ता, महाराष्ट्र, किर्लोस्कर, इत्यादींचे उत्कृष्ट अभिप्राय.*

*डेक्कन व्हर्नॅक्युलर ट्रान्सलेशन सोसायटी, पुणें, कडून पुरस्कार.*

**सर्वत्र मिळतें. स्वतः वाचा, संग्रहीं ठेवा, आणि भेटीदाखल द्या.**

## प्रमुख ब्रिटिश बँकांचे वाढते नफे व डिव्हिडंड

( कंसांतील आंकडे द. सा. द. शे. डिव्हिडंडचे आहेत )

| | १९५१ पौंड | १९५२ पौंड | १९५३ पौंड | १९५४ पौंड | १९५४ मधील फरक % |
|---|---|---|---|---|---|
| बार्कलेज | १९,०८,४३७ (८.८) | २१,३७,७२२ (८.८) | २३,००,१५० (१०) | २५,४९,३९९ (१२) | +१०.८ |
| लॉईडस | १८,१५,८५८ (१२) | १९,६४,६६५ (१२) | २०,८३,७८१ (१४) | २१,८६,०७२ (१५) | +४.९ |
| मिडलंड | १९,२५,३१६ (१६) | २०,७४,८८७ (१६) | २१,१७,२०२ (१६) | २३,९७,५९७ (१८) | +१२.७ |
| नॅ. प्रॉव्हिन्शिअल | १४,६९,७६५ (१५) | १५,२५,०१३ (१६) | १७,६५,७६८ (१७) | १८,२७,०४४ (१८) | +३.५ |
| वेस्टमिन्स्टर | १४,०५,४५३ (१४.४) | १४,४६,५४६ (१४.४) | १४,७४,७३६ (१४.४) | १६,१३,१९७ (१६) | +१०.१ |
| " पांच वडी प्रस्थें " | ८५,२४,८२९ | ९१,४८,८३३ | ९७,५१,३६७ | १,०५,८३,३०९ | +८.५ |
| मार्टिन्स | ७,२५,१०७ (१५) | ७,४६,३०९ (१५) | ८,१९,९२१ (१७½) | ९,१८,४७७ (१७½) | +१२.४ |
| डिस्ट्रिक्ट | ५,०८,२१७ (१८⅓) | ५,१५,६७२ (१८⅓) | ५,५९,७४४ (२०) | ५,८८,८६३ (२०) | +५.२ |
| " सात वडी प्रस्थें " | ९७,५८,१५३ | १,०४,१०,८१४ | १,११,३१,३०२ | १,२०,९०,६४९ | +८.६ |

**चीनमधील अणुशक्तीचीं केंद्रें**—तिबेटच्या उत्तरेस असलेल्या चिकिअँग प्रांतांत कम्युनिस्ट चीननें अणुशक्तीचें एक केंद्र उभारण्यास सुरवात केली आहे, असें समजतें. चीनचा आर्थिक विकास घडवून आणण्यासाठीं अणुशक्तीच्या साह्यानें वीज निर्माण करणारीं कांहीं केंद्रेंहि बांधण्यांत येत आहेत. रशिआंत जीं अणुशक्तीचीं केंद्रें बांधलीं जातील त्यांच्याशीं हीं जोडण्यांत येण्याची सोय करण्यांत येत आहे.

**हैद्राबादमधील चित्रपट-महोत्सव**—हैद्राबाद येथील इंडो-सोव्हिएट सांस्कृतिक सोसायटीनें लहान मुलांसाठी एक चित्रपट महोत्सव भरविला होता. ह्या प्रसंगाच्या निमित्तानें हैद्राबाद सरकारनें लहान मुलांना पहाण्यास योग्य अशा चित्रपटांचा संग्रह करून तो दाखविण्याची व्यवस्था करण्याचें ठरविलें आहे. ह्या कामासाठीं प्रत्येक जिल्ह्यांत एक सुसज्ज मोटार ठेवण्यांत येणार आहे.

**पाकिस्तानकडून भारताला एंजिनें**—नॉर्थ इस्टर्न रेल्वेला पाकिस्तान सरकारकडून १० रेल्वे-एंजिनें आणि २०० मालाचे डबे कर्जाऊ म्हणून मिळाले आहेत. गेल्या डिसेंबरमध्यें पाकिस्तान सरकारनें भारताला १२ रेल्वे-एंजिनें आणि ५०० मालवाहू डबे कर्जाऊ देण्याचें कबूल केलें होतें. रेल्वेचें वरील साहित्य करारास अनुसरून देण्यांत आलें आहे.

**कॅन्सरच्या रोग्यानें केलेली फिर्याद**—अमेरिकेंतील सेंट लुई ह्या शहरांत कॅन्सर झालेल्या एका रोग्यानें एका सिगारेट कंपनीविरुद्ध फिर्याद दाखल केली होती. स्वतःस झालेला फुप्फुसाचा कॅन्सर सदर कंपनीच्या सिगारेटस ओढल्यामुळें झाला, असें त्याचें म्हणणें होतें. रोगी दगावल्यामुळें २५ लाख रुपयांच्या मागणीचा त्याचा दावा सहाजीकच फेटाळण्यांत आला. रोग्याच्या कुटुंबातर्फे आतां पुन्हां दावा लावण्यांत येणार आहे.

**पंचवार्षिक योजनेला मदत**—झेकोस्लोव्हाकिआ आणि भारत ह्यांच्या दरम्यान व्यापारी संबंध प्रस्थापित करण्यासाठीं वाटाघाटी चालू आहेत. भारताच्या दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमास आर्थिक मदत देण्याची तयारीहि झेक सरकारनें दाखविली आहे. ही मदत मूलभूत उद्योगधंद्यांची स्थापना व तांत्रिक ज्ञान, ह्यांच्या रूपानें करण्यांत येणार आहे.

**नागपुरांत घड्याळाचा मनोरा**—राजगड येथील शेठ करोडीमल ह्या धनिकानें नागपूरच्या नगरपालिकेला १ लाख रुपयांची देणगी दिली आहे. देणगीचा विनियोग सीता चौकांत घड्याळाचा मनोरा बांधण्यासाठीं करण्यांत येणार आहे. मनोरा ६० फूट उंचीचा होईल आणि त्यावर गांधीजींचें चित्र असेल.

**ब्रिटिश कापडाची निर्यात घटली**—१९५३ सालाच्या मानानें १९५४ सालीं ब्रिटनमधून निर्यात झालेली कापसाच्या कापडाची निर्यात १० टक्क्यांनीं कमी आहे. कापड उत्पादन करणाऱ्या इतर देशांशीं ब्रिटनला जोराची स्पर्धा करावी लागत आहे. १९५४ सालचें कापडाचें उत्पादन मात्र १९५३ सालापेक्षा बरेंच अधिक आहे.

**सीलोनमध्यें दारूबंदी ?**—सीलोनचे माजी मुख्य प्रधान मि. डडले सेनानायके ह्यांना सीलोनमध्यें दारूबंदी व्हावी असें वाटत आहे. ते ज्या राजकीय पक्षाचे आहेत, त्या पक्षाचें अधिवेशन २६ फेब्रुआरीला भरलें होतें. दारूबंदी, जुगार-बंदी व रेसबंदी करण्याविषयीं त्यांनीं एक ठराव पाठविला. अधिवेशनांत ठरावावर चर्चा झाली.

**अमेरिकन हौशी प्रवासी**—भारताचा दौरा करण्यासाठीं ४९० अमेरिकन प्रवाशांचा एक गट आलेला आहे. हे सर्व प्रवासी दोन खास गाड्यांनीं नुकतेच दिल्लीहून आग्रा येथें गेले. ताजमहाल व इतर मोंगली इमारती पाहून ते अकबरानें बांधलेला फत्तेपूर-शिक्री हा किल्ला पहाण्यास गेले.

## १९५५-५६ चा रेल्वे अर्थसंकल्प

( आंकडे कोटी रुपयांचे )

| | पक्के आंकडे १९५३–५४ | अर्थ संकल्प १९५४–५५ | दुरुस्त अंदाज १९५४–५५ | अर्थ संकल्प १९५५–५६ |
|---|---|---|---|---|
| वाहतुकीचें एकूण उत्पन्न | २७४.२९ | २७३.२५ | २८२.८० | २९२.५० |
| चालू खर्च | २०१.७५ | १९४.५३ | २०२.९५ | २०६.८० |
| निव्वळ किरकोळ खर्च | ५.६२ | ८.०८ | ८.३२ | ७.४९ |
| घसारा, राखीव निधींत जमा | ३०.०० | ३०.०० | ३०.०० | ३५.०० |
| एकूण | २३७.३७ | २३२.६१ | २४१.२७ | २४९.२९ |
| निव्वळ रेल्वे महसूल | १६.९२ | ४०.६४ | ४१.५३ | ४३.२१ |
| सर्वसाधारण महसुलांत जमा | ३४.३६ | ३५.५० | ३४.९६ | ३६.०७ |
| निव्वळ शिल्लक | २.५६ | ५.१४ | ६.५७ | ७.१४ |

### कमी अंतराच्या रेल्वेदरांत वाढ

| वर्ग | सध्यांचे सरसकट दर | मैल | संकल्पित सरकत्या श्रेणींचे दर |
|---|---|---|---|
| एअर कंडिशण्ड | दर मैलास ३० पै | १–३०० | दर मैलास ३४ पै |
| " | " " " " | ३०१ व त्यावर | " " ३२ " |
| दुसरा | " " १६ " | १—१५० | " " १८ " |
| " | " " " " | १५१–३०० | " " १६ " |
| " | " " " " | ३०१ व त्यावर | " " १५ " |
| इंटर मेल/एक्सप्रेस | " " १०½ " | १–१५० | मेल/एक्सप्रेस " " ११ " |
| | | | ऑर्डिनरी " " ९½ " |
| ऑर्डिनरी | " " ९ " | १५१–३०० | मेल/एक्सप्रेस " " १०½ " |
| | | | ऑर्डिनरी " " ९ " |
| | | ३०१ व त्यावर | मेल/एक्सप्रेस " " ९½ " |
| | | | ऑर्डिनरी " " ८½ " |
| तिसरा मेल/एक्सप्रेस | " " ६ " | १–१५० | मेल/एक्सप्रेस " " ६½ " |
| | | | ऑर्डिनरी " " ५½ " |
| ऑर्डिनरी | " " ५ " | १५१–३०० | मेल/एक्सप्रेस " " ६ " |
| | | | ऑर्डिनरी " " ५ " |
| | | ३०१ व त्यावर | मेल/एक्सप्रेस " " ५ " |
| | | | ऑर्डिनरी " " ४½ " |

बदललेले दर १ एप्रिल, १९५५ पासून सुरू होतील. याच दिवसापासून सध्यांच्या दुसऱ्या व इंटर वर्गास अनुक्रमें पहिला व दुसरा वर्ग समजण्यांत येईल.

**ब्रिटन-चीन व्यापार**—ब्रिटिश व्यापाऱ्यांचें एक मंडळ चीनला गेलें होतें. त्यांनीं चीनसाठीं ४० लाख पौंड किंमतीच्या मालाची मागणी नोंदविली आहे. चीन आणि ब्रिटन ह्यांच्यामधील व्यापार अडथळ्यांवाचून सुरू झाल्यास लवकरच दरवर्षी ८ ते १० कोटी पौंडांपर्यंत त्याची वाढ होऊं शकेल, असा अंदाज करण्यांत आला आहे.

**पाकिस्तानांत भारतीय बोलपट**—भारतामधून बोलपट आयात करण्यासंबंधी पाकिस्तान सरकार नवें धोरण जाहीर करणार आहे असें समजतें. पाकिस्तानांत बोलपटांचा तुटवडा असल्यामुळें अधिक प्रमाणांत भारतीय बोलपटांची आयात केली जाण्याचा संभव आहे.

## भोर स्टेट बँक लि., भोर.

### संचालकांचा अहवाल

३१ डिसेंबर, १९५४ अखेरच्या व्यवहारांत बँकेस निव्वळ नफा रुपये ९७९७–७–३ झाला आहे. यामध्यें मागील सालचा राहिलेला नफा रुपये १०३–११–६ मिळवितां एकूण नफा रुपये ९,९०१–२–९ पुढीलप्रमाणें वाटावा अशी संचालकमंडळाची शिफारस आहे.

| | | |
|---|---|---|
| ( १ ) रिझर्व फंडासाठीं तरतूद | रुपये | ३२००–०–० |
| ( २ ) इन्कम् टॅक्ससाठीं तरतूद | " | ३५००–०–० |
| ( ३ ) बुडित व संशयित कर्जासाठीं तरतूद | " | ३०००–०–० |
| ( ४ ) पुढील वर्षी शिलकी नफा ओढणें | " | २०१–२–९ |
| एकूण | रुपये | ९,९०१–२–९ |

अहवालाचे सालांत रिझर्व फंडासाठीं जादा रक्कम रु. १२१८–९–१० ची तरतूद करणें जरूर आहे. कारण मागील सालीं इन्कमटॅक्ससाठीं तरतूद करून मग रिझर्वफंडाची तरतूद केली. व त्यामुळें रिझर्व फंडासाठीं रक्कम कमी पडली म्हणून अहवालाचे सालीं जादा तरतूद करावी लागत आहे. बोर्डानें चालू सालीं भागावरील फायदा न वाटतां झालेल्या नफ्याचा विनियोग संशयित, बुडीत व राखीव फंडाकरितां करण्याचें ठरविलें आहे. बोर्डानें शिरवळ व पाली शाखांसाठीं स्थानिक सल्लागारमंडळें नेमलीं आहेत. त्याचप्रमाणें भोरसाठीं एक सल्लागारमंडळ नेमलें आहे. बोर्डास असा विश्वास आहे कीं यांचा उपयोग बँकेची प्रगति करण्याकडे होईल. नुकताच रिझर्व बँक ऑफ इंडियानें नेमलेल्या ग्रामीण पत-पाहणी समितीचा रिपोर्ट प्रसिद्ध झाला आहे. या अहवालाचे शिफारसीप्रमाणें ग्रामीण विभागांत बँकिंगचा प्रचार कसा करतां येईल याबद्दल संचालक मंडळ विचार करीत आहे.

संचालकमंडळापैकी मा. के. व्ही. केळकर, एम्. ए., एलूएल्. बी. यांनीं प्रकृतीस्वास्थ्यासाठीं राजीनामा दिला आहे. श्री. के. व्ही. केळकर यांनीं संचालक मंडळास वेळोवेळीं सल्लामसलत देऊन मार्गदर्शन केलें त्याबद्दल बोर्ड आभारी आहे.

### जॉन व मेरी—सर्वांत लोकप्रिय नांवें

'दि टाइम्स' पत्रांत १९५४ मध्यें प्रसिद्ध झालेल्या जन्मांच्या व दत्तक विधानांच्या एकूण नोंदीवरून, मुलांच्या ठेवलेल्या नावांचा अनुक्रम लावण्यांत आला आहे. त्यावरून, मुलग्यांच्या नांवांत जॉन, डेव्हिड, जेम्स, चार्लस, हीं नांवें त्या क्रमानें आढळतात. मुलींच्या नांवांत मेरी, ॲन, जेन, एलिझाबेथ, हीं नांवें त्या क्रमानें आढळतात. 'दि टाइम्स' मध्यें प्रसिद्ध झालेल्या मृत्यूंच्या नोंदीवरून मयतांच्या नांवांच्या संख्येनुसार अनुक्रम लावला, त्यांतहि जॉन व मेरी ह्यांचीच संख्या सर्वांत अधिक आढळली !

### राणीचें घड्याळ हरवलें

ग्रेटब्रिटनच्या राणीचें रिस्टवॉच बॅकिंगहम हाऊस येथें नुकतेंच हरवलें. राणी व तिची आई हीं दोघे चालत असतांना घड्याळ पडलें. रॉयल इंजिनिअर्सचें माइन डिटेक्टर पथक घड्याळाच्या शोधासाठीं पाठविण्यांत आलें, पण घड्याळ सांपडलें नाहीं. जगांतील तें सर्वांत लहान घड्याळ होतें. नाजूक प्लॅटिनमच्या बांगडींत तें बसविलेलें होतें व त्याच्या तबकडीची लांबी–रुंदी तीन सोळांश इंच एवढी होती. फ्रान्सचे अध्यक्ष लेब्रन ह्यांनीं १९३७ मध्यें राणी राजकन्या असतांना तिला तें नजर केलेलें होतें.

## दि बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना १९११

मुख्य कचेरी : ९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.

टेलिफोन नं. ३८,३८१ / ३८,३८२ | पोस्ट बॉक्स नं. ४७२ / तारेचा पत्ता : फार्मरबँक

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका शेतकरीवर्ग व सर्व प्रकारच्या सहकारी संस्था ह्यांच्याच उपयोगासाठी दिला जातो.

भरपाई झालेलें भांडवल

| | |
|---|---|
| भागीदारांतर्फे | रु. ३४,०६,७५० |
| मुंबई सरकारतर्फे | रु. २६,००,००० |
| | रु. ६०,०६,७५० |
| गंगाजळी व फंड | रु. ५७,५४,८०० |
| ठेवी | रु. ७,९०,२५,३०० |
| खेळतें भांडवल | रु. १२,७१,२७,००० |

### १६ जिल्ह्यांमध्यें ६७ शाखा

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तींबद्दल चौकशी करावी.

वा. पुं. वर्दे
ऑनररी मॅनेजिंग डायरेक्टर.

## दि रत्नाकर बँक, लिमिटेड

स्थापना—१९४३

मुख्य कचेरी :—लक्ष्मी रोड, कोल्हापूर

—शाखा—

सांगली, शाहूपुरी, मिरज, जयसिंगपूर

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल ... | रु. २०,११,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल ... | रु. १०,०६,६०० |
| रोख वसूल शेअर भांडवल ... | रु. ५,०३,३०० |
| रिझर्व्ह व इतर फंड ... | रु. १,४०,००० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) ... | रु. ५०,००,००० |

—यथायत् बँकिंग-व्यवहार केले जातात—

श्री. बी. बी. चौधरी, बी. ए., एलएल. बी., वकील. सांगली, चेअरमन
श्री. महादेव बाळाप्पा चौगुले, कोल्हापूर, व्हा. चेअरमन

एल्. एन्. शहा,
बी. कॉम, सी. ए. आय. आय. बी.
मॅनेजर.

## भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

मुख्य कचेरी:—भोर, जि. पुणें.

शाखा:—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ७१,६०० |

### बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. द्. खोले. — श्री. चं. रा. राठी.
श्री. के. वि. केळकर, एम्. ए., एलएल्. बी. — श्री. बा. ग. धंडुके.

सरकारी रोखे खरेदी–विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी:—बुधवार घ. नं. २६१–६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

वाय. एस. जोशी, अ. मॅनेजर. — एन्. व्ही. पांडव, मॅनेजर

## दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

शाखा:—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर ( बेलापूर रोड ), ओझर ( जि. नाशिक ) खोपोली ( जि. कुलाबा )

श्री. कं. पां. जोशी ( अध्यक्ष ) — श्री. ह. ब. गिरमे ( उपाध्यक्ष )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ४,००,००० |
| रिझर्व्ह फंड व इतर रिझर्व्ह | रु. १,००,००० |

### एकूण खेळतें भांडवल ६० लाखांचे वर

बँकेचे नवीन इमारतींत माफक भाड्यांत सेफ डिपॉझिट लॉकर्सची सोय केली आहे.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. बा. साळवेकर, B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
मॅनेजिंग डायरेक्टर.


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२१ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ), पुणें ४, येथें प्रसिद्ध केलें.